फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१२३/२०२१ मधील
निशाणी क्र.१ वरील आदेश
**(CNR NO.MHPU170028352021).**

शुभांगी उर्फ किर्ती धुमाळ वि. समीर उर्फ रवि धुमाळ वगैरे.

अर्ज व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार व जाबदार क्र.१ हे पती–पत्नी असुन जाबदार क्र.२ हा अर्जदाराचा सासरा आहे. जाबदार क्र. ३ ते ९ हे अर्जदाराचे चुलत सासु–सासरे, चुलत दीर व चुलत जाऊ आहेत. जाबदार क्र.३ ते ९ हे जाबदार क्र.२ व ३ यांच्यासोबत एकाच घरात रहात असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. जाबदार क्र.१ विरुध्द निश्चितरित्या कथन केले आहे. जाबदार क्र.२ हा जाबदार क्र.१ व अर्जदार यांच्यासोबत एकाच घरात रहात असावेत. अशा परिस्थितीमध्ये, अर्जदाराची जाबदार क्र.१ व २ यांच्याविरुध्द सकृतदर्शनी केस दिसुन येते. याऊलट, जाबदार क्र. ३ ते ९ यांच्याविरुध्द सकृतदर्शनी केस दिसुन येत नाही, म्हणुन जाबदार क्र.१ व २ यांच्याविरुध्द प्रस्तुत प्रकरणी नोटीस काढण्याचा आदेश करण्यात येत आहे. जाबदार क्र. ३ ते ९ यांच्याविरुध्द सकृतदर्शनी केस दिसुन येत नसल्यामुळे, त्यांच्याविरुध्द प्रस्तुत प्रकरणी कोणताही आदेश करण्यात येत नाही. आदेशाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRAKASH LALASAHEB PATIL
Date: 2022.01.19 15:14:46 +0530

इंदापूर. (पी.एल.पाटील)

दिनांक – १८/०१/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

<u>प्र मा ण प त्र</u>

'' मी, याद्वारे, असे प्रमाणित करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ.फाईलच्या आदेशातील मजकुर हा तिच्या मुळ आदेशातील मजकुराच्या शब्दांनुसार समान आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | र. सि. पारवे,<br>लघुलेखक निम्नश्रेणी –३. |
| न्यायालयाचे नांव व पदनाम | - | पी.एल.पाटील,<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर. |
| आदेशाची तारीख | - | १८/०१/२०२२. |
| आदेश न्यायिक अधिकारी यांनी स्वाक्षरित केल्याची तारीख | - | १८/०१/२०२२. |
| आदेश सी.आय.एस.प्रणाली मध्ये अपलोड केल्याची तारीख | - | १९/०१/२०२२. |